# निरीक्षण

आयुष्यात ब-याच गुणांबद्दल/ गोष्टींबद्यल बोलले जाते. उदा. जोखीम (Risk), श्रद्धा (Devotion), आनंद, निराशा, मनाची श्रीमंती , कंजुषी, प्रयत्न, सहकार्य वगैरे. मुलांना शाळेत सुद्धा हे गुण शिकवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु ह्या गुणांचे प्रत्यक्ष दर्शन घडविणे जरा कठीणच.

मी दर महिन्याला माझ्या गावाला जातो. सकाळी गाडी येईपर्यंत फलाटावर निरीक्षण करत असता वरील सर्व गोष्टीचें दर्शन घडते. खरी तर चित्रफीतच माझ्यासमोर तयार होते.

माझी गाडी येईपर्यंत 'ऑगस्ट क्रांती राजधानी' बोरिवलीला येते. त्यावेळी सर्व हमाल फलाटावर साखळी करून अंतरा अंतरावर उभे राहतात. गाडी फलाटात शिरली की इंजिनाला नमस्कार करून चालती गाडी पकडतात व थांबली की उतरतात व ग्राहकाची वाट पहातात. श्रीमंत प्रवासी आपले जड सामान घेऊन उतरायचा प्रयत्न करतात. हे हमाल सामान उतरवायला कसलीही अपेक्षा न करता हात देतात. फारच थोडया हमालांना काम मिळते. मजुरीची घासाघीस केली जाते. रू.२000 चे तिकीट काढून प्रवास करणारा ३0 रू. मजूरीवर घासाघीस करतो व सर्व सामान स्वतःच नेऊ पाहतो. ज्याला काम मिळते त्याच्या चेह-यावर आनंद असतो. इतरांच्या चेह-यावर निराशा.

माझ्यामते श्रीमंत माणूसच जास्त कंजुष असतो. ज्या श्रद्धेने इंजिनाला नमस्कार केला जातो त्याच्या अर्ध्या श्रद्धेने जरी भारतात लोकांनी काम केले तरी आपला देश फारच प्रगती करू शकेल. ज्या चपळाईने चालती गाडी पकडली जाते जेणेकरून एखादे गि-हाईक पटकावता येईल त्याला तर तोडच नाही. प्रत्येक हमालाच्या उभे राहण्याच्या जागा बहुधा आधीच ठरविलेल्या असतात. ज्याला काम मिळाले त्याच्या डोक्यावर सर्व सामान पैसा वसुल करण्यासाठी लादले जाते व प्रवासी एखादी लहान बॅग सुद्धा घेऊ इच्छित नाही. ह्या सर्व दृष्यातून श्रीमंतांच्या मनातील माणुसकीचा अभाव प्रकर्षाने जाणवतो.

आज सर्वत्र विचित्र परिस्थिती झाली आहे. श्रीमंत जास्त श्रीमंत होतो आहे व गरीब जास्त गरीब होतो आहे. ज्याला काम आहे त्याला डोके वर करायला वेळ नाही व ज्याला काम करण्याची इच्छा आहे त्याला करायला काम नाही.

पुढिल पिढीचे काय होणार आहे ते काळच ठरविल!!!